# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 31.08.2025** **वार- रविवार**

---

**<u>गौरी</u>**

गौराई आली सोन्या-मोत्याच्या पावलांनी असं म्हणत ज्येष्ठा कनिष्ठा गौरी अर्थात महालक्ष्म्यांचं आज घरोघरी मोठ्या उत्साहात आगमन झालं. खड्याच्या गौरी, शाडू, माती अथवा पितळी मुखवट्याच्या गौरी, तेरड्याच्या गौरी, आकर्षक रांगोळी आणि फुलांच्या सजावटीसह घरोघरी विराजमान झाल्या. तीन दिवस चालणाऱ्या या सोहळ्यात घराघरातून लहान थोरांची मोठी लगबग दिसून येत आहे.

दरम्यान, पाच दिवसांच्या घरगुती गणपतींचं आज विसर्जन होत असून पुणे शहरात देखावे पाहण्यासाठी भाविकांची गर्दी वाढत आहे.

**<u>डीबीटी</u>**

पुणे महापालिकेच्या शाळांमधील 82 हजार विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात शैक्षणिक साहित्य घेण्यासाठी 16 कोटी रुपये डीबीटी अर्थात थेट लाभ हस्तांतरणाद्वारे जमा करण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांना वह्या, गणवेश, दप्तर, बूट, स्वेटर यांसह इतर शैक्षणिक साहित्य पुरविले जात होतं. मात्र साहित्य खरेदीत भ्रष्टाचार होत असल्याचा आरोप सातत्यानं होत

असल्याच्या पार्श्वभूमीवर 2017 पासून निविदा न काढता थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात पैसे जमा करण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

**<u>ऊसगाळप</u>**

राज्यातल्या आगामी 2025-26 मधील हंगामात ऊस गाळप परवान्यासाठी साखर कारखान्यांनी ऑनलाइन अर्ज 1 सप्टेंबरपासून करायचे आहेत. अर्ज करण्याची अंतिम तारीख 30 सप्टेंबर असून, साखर कारखान्यांना परवाना अधिकाऱ्यांनी गाळप परवाना दिल्याशिवाय ऊस गाळप करता येणार नाही. विनापरवाना ऊस गाळप सुरू केल्यास कारवाई करण्याचा इशारा साखर आयुक्त सिद्धाराम सालीमठ यांनी नुकत्याच काढलेल्या प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिला आहे.

**<u>मृदचाचणी</u>**

राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत 2025-26 या वर्षात ग्रामस्तरीय मृदा आरोग्य आणि सुपीकता कार्यक्रमांतर्गत गावपातळीवर मृदा चाचणी प्रयोगशाळा उभारणीसाठी अर्ज मागवण्यात आले होते. कृषी विभागाकडे आलेल्या अर्जांची निवड प्रक्रिया कृषी आयुक्तालयात होणार आहे. पुणे जिल्ह्यात 15 मृदा चाचणी प्रयोगशाळा उभारल्या जाणार आहेत. यामध्ये शिरूर आणि जुन्नर तालुक्यात प्रत्येकी दोन, तर उर्वरित 11 तालुक्यांत प्रत्येकी एक प्रयोगशाळा उभारण्यात येणार आहे. पुणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आणि तरुणांना याचा मोठा लाभ होईल, अशी माहिती पुणे जिल्हा कृषी अधीक्षक संजय काचोळे यांनी आहे.

**<u>दूधदरवाढ</u>**

पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ म्हणजे ‘कात्रज’कडून महिनाभरात गाय दूध खरेदी दरात तीन वेळा दर वाढ करण्यात आली आहे. उद्या 1 सप्टेंबरपासून गाय दूध खरेदी दर एक रुपयानं वाढवून आता 35 रुपये करण्यात आला आहे. त्यामुळे ऐन सणासुदीमध्ये दूध उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असल्याची माहिती कात्रज दूध संघाचे अध्यक्ष स्वप्निल ढमढेरे यांनी दिली.

**वारली**

वारली कला ही केवळ चित्रकला नसून आदिवासी संस्कृतीचा उत्सव आहे. अर्थपूर्ण आकृत्यांमधून निसर्ग, सण-उत्सव आणि जीवनमूल्ये मांडणारी ही कला नव्या पिढीला रोजगार, नवनिर्मिती आणि सामाजिक विकासाचं साधन ठरत आहे, असे गौरवोद्गार माजी खासदार वंदना चव्हाण यांनी काढले. त्या आज 37 व्या पुणे फेस्टिवलमधल्या बालगंधर्व कलादालन इथं वारली चित्रकला प्रदर्शनाचं उद्घाटन करताना बोलत होत्या. यावेळी आदिवासी संचालनालयाच्या पुष्पलता मडावी यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

**प्रकाशन**

डॉ. ज्योती रहाळकर लिखित ‘गजानना तू’या काव्यसंग्रहात शास्त्र आणि कला यांची उत्तम सांगड साधली असून तत्त्वज्ञान, पंचमहाभुते आणि निसर्गाची महती या विषयीचा सांगोपांग विचार कवयित्रीनं मांडला आहे. असं मत ज्येष्ठ नृत्यगुरू स्मिता महाजन यांनी व्यक्त केलं. ‘गजानना तू’ आणि ‘कबीर वाणी’ या पुस्तकांचं प्रकाशन करताना त्या आज पुण्यात बोलत होत्या.

**<u>कृबास</u>**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात महाराष्ट्रसह कर्नाटक, तामिळनाडू, आंध्र प्रदेश, उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेश राज्यातून आज 90 ट्रक फळ भाज्यांची आवक झाली. कोबी, सिमला मिरची, घेवडा, शेवगा यांच्या भावात मोठी वाढ झाली तर पालेभाज्यांमध्येही तेजी असून मेथी, चाकवत, शेपू यांचे भाव वधारले आहेत. कोथिंबिरीच्या सव्वा लाख तर मेथीच्या साठ हजार जुड्यांची आवक झाली. फळ बाजारातही तेजी असून पपई, डाळिंब आणि खरबूज यांना ग्राहकांकडून चांगला उठाव मिळाल्याने भाव कडाडले आहेत. गेल्या दोन आठवड्यापासून फुल बाजारात असणारी तेजी गणेशोत्सवाच्या काळातही टिकून आहे. झेंडू, शेवंती, गुलछडी यासह शोभिवंत फुलांना मोठी मागणी आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**